सुधीर मुनगंटीवार यांच्यावर विश्वास ठेवत कॉग्रेसच्या शेकडो युवकांचा भाजपात प्रवेश

भाजपा महानगर अध्यक्ष राहुल पावडे यांचा पुढाकार

चंद्रपूर, दि. 16 एप्रिल 2024- राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्यावर दृढ विश्वास ठेवत, भाजपा चंद्रपूर महानगरचे अध्यक्ष राहुल पावडे यांच्या पुढाकाराने आज, 16 एप्रिल रोजी कॉग्रेसच्या शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

कॉग्रेस अल्पसंख्याक आघाडी जिल्हा चंद्रपूरचे माजी अध्यक्ष ॲड. शाकीर मललीक, कॉग्रेस वाहतूक सेलचे माजी जिल्हा अध्यक्ष इरफान शेख, वहाब काजी, पंकज तिवारी, आदिल खान, सरताज शेख, बिल्गू तिवारी, अक्षय भालेराव, रवी नायर यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं (आठवले गट), पीपल्स रिपब्लिकन पार्टी (कवाडे गट), रासप मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे सक्षम नेतृत्वात चंद्रपूर जिल्ह्याचा विकास करण्याचा या कार्यक्रर्त्यांनी संकल्प केला आहे.

भाजयुमो महाराष्ट्र प्रदेशचे सचिव इम्रान खान, चंद्रपूर महानगर युवा मोर्चा उपाध्यक्ष चांद शेख,साजीद अली व रेणुका घोडेस्वार यांनी त्यांचे भाजपाचा दुपट्टा देऊन स्वागत केले.